# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 06.08.2024** **वार– सोमवार**

---

**<u>मुख्यमंत्री</u>**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज पुण्यातल्या अतिवृष्टीग्रस्त विविध भागाला भेट दिली आणि पूरस्थितीचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी पूरग्रस्त नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. पूरबाधित नागरिकांना शासनाच्या वतीनं आवश्यक सर्व सहकार्य करण्यात येईल अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यावेळी उपस्थित होत्या.

**<u>Pcmc</u>**

पिंपरी चिंचवडमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे हजारो लोकांना महापालिकेनं सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित केलं आहे. या कामात काही स्वयंसेवी संस्थांनीही महापालिकेला मदत केली आहे.

**<u>पूरपरिस्थिती</u>**

पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये निर्माण होणाऱ्या पूरपरिस्थितीला दोन्ही महापालिका जबाबदार असल्याचा निष्कर्ष राज्य शासनानं नियुक्त केलेल्या तज्ज्ञांच्या समितीनं काढला असल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे. यासंदर्भातील अहवाल गेल्या दोन वर्षांपासून राज्य शासनाकडं पडून आहे. २०१९मध्ये पुण्यात आलेल्या पुरानंतर जलसंपदा विभागाच्या निवृत्त सचिवांच्या अध्यक्षतेखाली तत्कालीन सरकारने तज्ज्ञांची समिती स्थापन केली होती. पुणे आणि पंढरपूरमध्ये निर्माण होणाऱ्या पूर परिस्थितीचा अभ्यास करुन या समितीनं आपला अहवाल राज्य शासनाकडं सादर केला आहे. मुळा मुठा आणि पवना नदी पात्रातील वाढती अतिक्रमणं रोखण्यात दोन्ही महापालिकांना येत असलेलं अपयश; नदी पात्रात पडणारा राडारोडा आणि नदीच्या पूररेषेच्या आत होणारी अनधिकृत बांधकामं यामुळे धरणातून जरा जास्त प्रमाणात विसर्ग झाला की शहरात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होते असा निष्कर्ष या समितीनं काढला आहे. मात्र दोन वर्षांपासून हा अहवाल राज्य शासनाकडं असून त्यावर अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नाही.

**<u>आक्रोशमोर्चा</u>**

पुण्यात नुकत्याच आलेल्या पुरामुळे बाधित झालेल्या हजारो कुटुंबांना संपूर्ण नुकसान भरपाई द्यावी; तत्पूर्वी प्रत्येक कुटुंबाला २५ हजार रुपयांची मदत त्वरित द्यावी, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियानं केली आहे. यासाठी रिपब्लिकन पार्टीच्यावतीने येत्या गुरूवारी पूरगस्तांचा आक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती पार्टीचे शहराध्यक्ष संजय सोनवणे यांनी आज पुण्यात पत्रकार परिषदेत दिली.

झिका

पुणे जिल्ह्यात झिकाचा प्रादुर्भाव वाढत आहे. आत्तापर्यंत ७२ जणांना झिकाची लागण झाली असून, यातले ६५ रुग्ण पुणे शहरातील आहेत. या रूग्णांमध्ये पाच गर्भवती महिलांचा समावेश आहे. गर्भवती महिलांच्या बाळांच्या स्कॅनिंगचे अहवाल नॉर्मल आले असल्याची माहिती पुणे जिल्हा आरोग्य विभागानं दिली आहे. राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्था आणि ससून रुग्णालयातून आणखी

काही जणांच्या तपासणीचे अहवाल येणं बाकी आहे; ते आल्यानंतर झिका रुग्णांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे; त्यामुळे पुणेकरांनी काळजी घ्यावी असं आवाहन पुणे महानगर पालिकेनं केलं आहे.

**पिंपरीआजार**
कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेनं  तपासणी मोहीम तीव्र केली आहे. ज्या घरांत किंवा आस्थापनांमध्ये डासोत्पत्तीची ठिकाणं आढळली त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून सुमारे १ लाख ८६ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त अजिंक्य येळे यांनी आज ही माहिती दिली.

**रक्तदान**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी सरसंघचालक रज्जूभैय्या यांच्या स्मृतीप्रित्यर्थ कौशिक आश्रम आणि अक्षय सेवा संशोधन प्रतिष्ठान यांच्या वतीने नुकतंच पुण्यात रक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं. यामध्ये ५२६ जणांनी रक्तदान केलं. पुण्यात चार ठिकाणी ही शिबिरं घेण्यात आली. मुसळधार पाऊस सुरू असतानाही रक्तदात्यांनी शिबिरात येऊन आपलं रक्तदानाचं कर्तव्य पार पाडलं.

**महावितरण**
पुणे परिमंडलामध्ये विजेची वाढती मागणी लक्षात घेता वीज पुरवठयासाठी वितरण आणि पारेषणच्या वीजयंत्रणेचं विस्तारीकरण करण्याचं नियोजित आहे. लवळे आणि बावधन इथं अतिउच्चदाब उपकेंद्राला महावितरणनं मंजूरी दिली आहे. त्यामुळे बावधन, कोथरूढ, वारजे, भुकूम, भूगाव, पिरंगुट, लवळे आणि नांदे या परिसराला आणखी दर्जेदार वीजपुरवठा होणार असल्याचं पुणे परिमंडळाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी सांगितलं.

**अवजडबंदी**
पुण्यातील ३० प्रमुख चौकांत तसंच विविध भागात येत्या १२ ऑगस्टपर्यंत अवजड वाहनांवर बंदी घालण्यात आली आहे. संचेती चौक, पौड फाटा चौक, राजाराम पूल, दांडेकर पूल, निलायम पूल, सावरकर पुतळा चौक, यासह विविध भागात ही बंदी लागू असेल, असं पुणे शहर वाहतूक पोलिसांनी कळवलं आहे.

**टेबलटेनिस**
प्रौढांच्या दुसऱ्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेतील सांघिक विभागात डेक्कन जिमखाना क्लबच्या 'अ' आणि 'ब' या दोन्ही संघांनी विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरीकडे वाटचाल केली. अन्य सामन्यांत टॉस अकादमी संघाने करिअर इलेव्हनचा ३-० असा पराभव करत उपांत्यपूर्व फेरी गाठली.

**हवामान**
पुणे आणि परिसरात आज पावसानं काहीशी विश्रांती घेतली आहे. उद्या शहरात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा; तर घाट माथ्यावर मुसळधार पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार**.